# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६**

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ७**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: व्ही-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४२५, सहकार**<br>**रूपये:- १५,५२,४२,८९,०००/-**<br>**श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१) | १४९५ | १० | भंडारा व गोदिया जिल्हयातील सहकारी सोसायट्यांचे संगणकीकरण सर्व PACS (प्राथमिक सहकारी पतसंस्था) व सोसायट्यांचे डिजिटल रेकॉर्ड पारदर्शक व्यवहार सुनिश्चित नसणे सहकारी सोसायट्यांच्या थकबाकी व वसुली समस्या शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाचे पुनर्गठन व थकबाकीदारांना सवलत उपलब्ध नसणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (२) | १४५७ | १० | मुंबईतील सांताक्रुज (प.) जुहू येथील सीएस क्र. १२७ मधील स्टर्लिंग सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रकरणात म्हाडाच्या तत्कालिन उपनिबंधक, आदिनाथ दगडे यांनी संस्थेचे योगेश शेट्टी यांचेसह सहा मुळ सदस्यांचे पदाचा व अधिकार पदाचा दुरुपयोग करुन दि.१३.०१.२०२३ रोजी आदेश काढून समिती सदस्यत्व पद रद्द केल्याचा प्रकार घडणे. सदरहू प्रकरणात उपनिबंधकांनी निबंधक सहकार संस्था यांचे पुणे यांचे कोणतेही अभिप्राय न घेता व त्यांचे कोणतेही आदेश नसतांना तसेच संस्थेविरुध्द कोणाचीही तक्रार नसतांना, स्व:अधिकारात दगडे यांनी कलम ७८ (अ) अन्वये, निवडूण आलेली संपूर्ण समिती कार्यकारिणी बरखास्त न करता काही सदस्यांची सदस्यत्वाची पदे रद्द करुन, अर्थिक गैरव्यवहार करण्यात येणे, शिवाय सदरहू प्रकरणास म्हाडाचा ठराव क्र.६४८० दि.०६.०५.२०१० रोजीचा ठराव संस्थेच्या प्रकरणाला लागूच होत नसणे, २००५ मध्ये सदस्यत्व प्राप्त झालेल्या मुळ सदस्यांचे सदस्यत्व २०१० च्या म्हाडाच्या ठरावानुसार रद्द होऊच शकत नसणे, रद्द केलेल्या समिती सदस्यांना पुन्हा सदस्यत्व पद बहाल करुन, संस्थेची पुन्हा नव्याने निवडणूक प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | १४६४ | १० | मुंबईतील सांताक्रुज (प.) जुहू येथील सीएस क्र. १२७ मधील स्टर्लिंग सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रकरणात कार्यकारणी समिती अस्तित्वात नसतांना व गृहनिर्माण संस्थेवर प्रशासक नियुक्त असतांना तत्कालिन उपनिबंधक, आदिनाथ |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | दगडे, सहकार संस्था, म्हाडा यांनी पदाचा दुरुपयोग करुन व अर्थिक संगनमत करुन, हिरेन्द्र गांधी या त्रयस्थ सदस्य व्यक्तीला सदस्यत्व पद मंजूर केल्याचा प्रकार घडला घडणे, सदरहू प्रकरणात संस्थेचे १४ सदस्य अस्तित्वात असतांना उपनिबंधकानी म्हाडाची परवानगी व अभिप्राय न घेता सहकार कायदा २३ (२) चा गैरवापर करुन हिरेन्द्र गांधी यांना १५ वा सदस्य म्हणून, मान्यता दिल्याचा प्रकार घडणे,सदरहू प्रकरणात सदनिका दिल्या नसतांना १५ वा सोसायटी सदस्य बेकायदेशीररित्या समाविष्ट करण्यात येणे, या संदर्भात लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, मा. सहकार मंत्री यांना दि.१२.११.२०२५ रोजी लेखी निवेदन देऊनही, यावर शासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही न करणे, सदरहू प्रकरणाची चौकशी करुन व तत्कालिन उपनिबंधकाना, सेवेतून तत्काळ बडतर्फ करुन, बेकायदा बहाल केलेले सदस्यपद तत्काळ रद्द करणेबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (४) | १४८४ | १० | राज्यातील अनेक आजारी व अवसायनात निघालेले सहकारी साखर कारखाने सध्या खासगी कंपन्या किंवा संस्थांना भाडेतत्त्वावर चालविण्यास दिले असणे, मात्र, अनेक ठिकाणी हे कारखाने शेतकऱ्यांची एफआरपी (FRP) रक्कम वेळेत देण्यास टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आले असणे, अशा कारखान्यांच्या मालमत्तेवर कायदेशीर निर्बंधांमुळे वसुलीत अडचणी येत असणे,या पार्श्वभूमीवर, सरकारने घेतलेला १० कोटी रुपयांच्या बँक गॅरंटीचा निर्णय स्वागतार्ह असणे परंतु, केवळ गॅरंटी पुरेशी नसून, विहित मुदतीत एफआरपी न दिल्यास या रकमेतून व्याजासह वसुली होणे आवश्यक असणे, तसेच, थकबाकी वसूल न झाल्यास संबंधित एजन्सी किंवा कंपनीच्या स्थावर व जंगम मालमत्तेवर, तसेच साखर, मळी व बगॅस या उत्पादनांवर जप्तीची कारवाई करण्याची कठोर अंमलबजावणी होणे गरजेचे असणे, जिल्हाधिकाऱ्यांमार्फत अशा कारखान्यांच्या मालमत्तेतून शेतकऱ्यांचे पैसे वसूल करण्यासाठी शासन कोणती कालबद्ध यंत्रणा राबविण्याची आवश्यकता तसेच हंगामात शेतकऱ्यांना शंभर टक्के मोबदला मिळण्याची खात्री सरकार तर्फे देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: व्ही-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४३५, इतर कृषिविषयक कार्यक्रम**<br>**रूपये:- ६९,९५,१०,०००/-**<br>**श्री. गजानन लवटे** |
| (५) | १२४२ | १०० | अमरावती जिल्ह्यातच नव्हे तर सर्वीकडे ज्या शेतकऱ्यांनी आपल्या शेतीसाठी पीककर्ज घेतले या सर्व कर्जदार शेतकऱ्यांची खाती राष्ट्रीय बँकांनी गोठवली असल्यामुळे शेतकऱ्यांना बँकेमध्ये व्यवहार करणे कठीण झाले आहे. शासनाच्या सूचना आहे शेतकऱ्यांची खाती गोठऊ नये म्हणून तरीसुद्धा राष्ट्रीय बँकांनी थकीत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कर्जदार शेतकऱ्यांची राष्ट्रीय बँकेतील खाती गोठवून ठेवली आहेत याबाबत कर्जदार शेतकऱ्यांची खाती त्वरित चालू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: व्ही-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ६८६०, ग्राहकोपयोगी उद्योगांसाठी कर्जे**<br>**रूपये:- ६,००,००,०००/-**<br>**श्री. नानाभाऊ पटोले** |
| (६) | १४९९ | १० | भंडारा व गोंदिया जिल्हयातील  हस्तकला व हातमाग उद्योग प्रोत्साहन गावोगावी महिलांसाठी स्वयंरोजगार व वस्त्रोद्योग प्रशिक्षण उपलब्ध नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | १५०१ | १० | भंडारा व गोंदिया जिल्हयातील ग्रामीण वस्त्रोद्योग पार्क साकोली, लाखनी व लाखांदुर परिसरात लघुउद्योग, शिवणकाम, यांना प्रोत्साहन उपलब्ध नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १३ मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई